# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १७९/२००८/ दिनांक :

१) मे. जयचंद्र टेक्स्टाईल, कुपवाड, एमआयडीसी, कुपवाड,जि.सांगली अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडळ कार्यालय, विश्रामबाग , सांगली.

२) कार्यकारी अभियंता (शहर),महावितरण,
शहर विभाग, हिराबाग वॉटर वर्क्सजवळ, सांगली. विरूध्द पक्षकार

३) उपकार्यकारी अभियंता,महावितरण,उ. वि. माधवनगर,सांगली.
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**कोरम :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

श्री. जावेद मोमीन, अर्जदार प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ६.५ चे तरतुदीनुसार

## न्यायनिर्णय

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे                    दिनांक ११.११.२००८

प्रस्तुत तक्रार अर्ज हा या कार्यालयामध्ये दिनांक ३.७.२००८ रोजी प्राप्त झाला. अर्जदार हे यंत्रमागधारक असून ते वितरण कंपनीचे ग्राहक आहेत व त्यांचा ग्राहक क्र. २७९२४०१०५०५० असा आहे. अर्जदाराचे म्हणणे की, महाराष्ट्र सरकारने यंत्रमागधारकांसाठी यंत्रमाग संजीवनी योजना लागू केली होती व त्याप्रमाणे ग्राहकांची दि. ३१.३.२००४ अखेरची थकबाकी ५०% ने माफ करण्यात आली होती. अशा या योजनेचा लाभ वि.प.ने अर्जदारास दिलेला नाही. असे असतांनाही अर्जदाराने वेळोवेळी वीज बिलापोटी कांही रक्कम भरलेली आहे. तरीपण वि.प.ने अर्जदाराचा विद्युत पुरवठा बंद करणेसाठी १५ दिवसांची नोटी लागू केली व नोटीसीची अखेरची तारीख ८.८.२००८ अशी असलेने व अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दिलेल्या तक्रार अर्जाचा अद्याप निकाल लागला नसला तरी अर्जदाराने प्रस्तुत अर्ज या मंचाकडे दाखल केला आहे. याच अर्जामध्ये अर्जदाराने त्यांचा विद्युत पुरवठा खंडित होवू नये म्हणून वि.प. विरुध्द प्रतिबंधात्मक आदेशाची मागणी केली आहे. अर्जदाराचे पुढे म्हणणे की, यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ देवून जरुर ती वीज बिलाची आकारणी करण्यात यावी व तसे आदेश वि.प.स देण्यात यावेत.

या प्रकरणामध्ये या मंचाचे सदस्यद्वयांनी दि. १५.७.२००८ रोजी अंतरीम आदेश देवून थकबाकीची वसुली स्थगित केली मात्र चालू बिलाची रक्कम वसूल करणेस मुभा दिली. पुढे सदर अर्जाबाबत वि.प.ला नोटीस काढून त्यांचे म्हणणे दाखल करण्याची संधी दिली. पुढे दरम्यानचे काळात दि. ११.८.२००८ रोजी अर्जदाराचे व अन्य या प्रकारच्या अर्जदारांच्या संयुक्त अर्जावर नोटीसीप्रमाणे बिले वसूल करणे बाबत, अर्जाचा निकाल होईपर्यंत, स्थगिती आदेश देण्यात आला. वि.प.तर्फे म्हणणे दाखल करण्यात आले. तसेच या सोबत सीपीएलचे उतारे व ऑडीटेड स्टेटमेंटस् अशी कागदपत्रे देण्यात आली. तसेच अर्जदारातर्फे दि. २०.८.२००८ रोजी एप्रिल,२००४ ते मार्च २००५ पर्यंत भरणा केलेल्या रकमांचा तपशिल देण्यात आला. वि.प.च्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तुत अर्ज निराधार व खोटा आहे. अर्जदार यांना कोणत्याही प्रकारची नोटीस देण्यात आलेली नव्हती, कारण अर्जदाराने मे २००८ मध्ये रक्कम भरणा केली होती. वास्तविक पहाता, अर्जदारास महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या २१.७.२००४ व ११.१.२००५ या तारखांचे यंत्रमाग संजीवनी योजनेप्रमाणे जरुर ते लाभ मार्च २००४ रोजी असलेल्या थकबाकीमध्ये देण्यात आलेले आहेत व पुढे होणरे बील या बाबत त्यांना कळविण्यात आले. तसेच अर्जदार यांना जून २००८ मध्ये सर्व बाकी येणे व भरणा या बाबतचा हिशोब समजावून सांगितला होता. यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ त्यांना देण्यात आला होता. सदरची बाब व हिशोब अर्जदाराने मान्य केले होते व त्याप्रमाणे अर्जदाराने रु. १,२२,०००/– अशी रक्कम बिलापोटी भरली होती. जुलैं २००८ अखेर अर्जदार ग्राहकाची वि.प.कडे रु. २०५९.०८ इतकी रक्कम आगाऊ जमा आहे. सबब प्रस्तुत अर्ज विनाकारण केला असलेने फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी सांगली व कोल्हापूर अशा दोन ठिकाणी ठेवण्यात आली होती. अर्जदारातर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. जावेद मोमीन यांनी अर्जदासराची बाजू मांडली. या उलट, वि.प.तर्फे कार्यकारी अभियंता सर्वश्री चव्हाण, पी.जी. जेधे, सहाय्यक लेखापाल हे हजर होते व त्यांनी त्यांची बाजू मांडली.

दोन्ही पक्षकारांचे म्हणणे आमच्या समोर आलेल्या कागदपत्रांवरुन विचारात घेता, खालील मुद्दे आमचे निष्कर्षास उदभवतात.

१) तक्रार अर्जदारा यांना त्यांचा विद्युत पुरवठा बंद करणे बाबत वि.प.ने १५ दिवसांची नोटीस दिली होती काय ?

उत्तर : नाही

२) अर्जदार यांना महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ वि.प.तर्फे देण्यात आलेला आहे काय ?

उत्तर :होय

३) आदेश ?

उत्तर : अखेरच्या आदेशाप्रमाणे

**<u>कारणमिमांसा</u>**

सकृतदर्शनी सदरच्या अर्जाचा विचार करता, अर्जदाराने त्यास १८ जुलैं २००८ अखेर वीज खंडित करणेबाबत नोटीस आलेबाबतचा मुद्दा हा मोघम व कोणत्याही आधाराशिवाय त्यांचे अ नमुन्यातील अपिलात निर्देशित केला आहे. अर्जदाराने अशी नोटीस अर्जासोबत अथवा तद्नंतर सुनावणीच्या काळामध्ये कधीही दाखल केलेली नाही अथवा अशी नोटीस का दाखल करु शकत नाही याचे कारणही दिलेले नाही. सबब अशी नोटीस त्यांना देण्यात आलेली नव्हती हे अनुमान कायद्याप्रमाणे निघू शकते. परिणामी, या अर्जाचा संपूर्ण उगमच सदोष असल्याचे दिसून येते. दिनांक १५.५.२००८ रोजी सदरचे अर्जदाराने रु. १,२२,०००/– वीज बिलापोटी भरले आहेत. तसेच त्या अगोदरही त्याने वेळोवेळी रकमा वीज बिलापोटी भरलेल्या आहेत. या सर्व रकमांचा उल्लेख वि.प.ने दाखल केलेल्या सीपीएल उताऱ्यामध्ये दिसून येतो. सीपीएलच्या उताऱ्यामध्ये अर्जदार ग्राहकास वापरलेल्या विजेबाबत जी आकारणी केली आहे ती महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या दराप्रमाणे केलेली आहे. मात्र यंत्रमागधारकांना सन २००१, २००३ व २००४ मध्ये वीज दरामध्ये जी सूट देण्यात आली होती त्या बाबतचा उल्लेख सीपीएल मधील बील आकारणीमध्ये आलेला नाही. सबब वि.प.ने त्या बाबत ऑडीटेड स्टेटमेंट तयार केले व वीज दराबाबत वेळोवेळी महाराष्ट्र सरकारने दिलेल्या सवलतीप्रमाणे आकारणी करुन वीज बिले ग्राहकाचे नांवे दिलेली आहेत. वि.प.ने दिलेल्या ऑडटेड स्टेटमेंट प्रमाणे एप्रिल २००० मध्ये अर्जदार ग्राहकाकडे रु. ११२३१.२६ एवढी बाकी दिसून येते व त्या बाबत सीपीएलमध्येही उल्लेख आहे. पुढे वीज आकारणीत सवलत दिली असलेने ऑडीटेड स्टेटमेंटमध्येही त्याबाबतचा उल्लेख आहे. त्याप्रमाणे मार्च २००४ मध्ये सदर अर्जदार ग्राहकाकडे रु. १६०९२.५६ एवढी थकबाकी होती. त्यामध्ये ५०% यंत्रमाग संजीवनी योजनेप्रमाणे सवलत देण्यात आली आहे. म्हणजे रु. ८०४६.२८ ही सवलत देवून उरलेली रक्कम रु. ८०४६.२८ ही ग्राहकाचे नांवे पुढे वसुलीसाठी दाखविलेली आहे.

यंत्रमाग संजीवनी योजनेप्रमाणे मुदती अखेर अर्जदारास रु. २५१९७.४८ एवढी रक्कम भरावी लागणार होती, मात्र त्यापोटी अर्जदाराने ४.४.२००४ ते ८.४.२००४ या दरम्यान रु. ३१८००/– एवढी रक्कम भरली आहे. पुढे वीज वापराची आकारणी करण्यात येवून त्याबाबतचा हिशोब जून २००८ मध्ये करण्यात आला.अशा प्रकारे अर्जदाराने दि. १५.५.२००८ पर्यंत भरलेल्या रकमेमध्ये रु. २०५९.०८ एवढी रक्कम वितरण कंपनीकडे आगाऊ भरण्यात आलेली आहे. वरील प्रमाणे यंत्रमाग संजीवनी योजनेचा लाभ अर्जदारास दिला असले बाबतचे वस्तुस्थिती बाबतचा विचार करता व अर्जदाराला वसुलीसाठी नोटीस दिली असल्याचे सिध्द न झालेने प्रस्तुत अर्ज हा विनाकारण केला आहे असेच अनुमान निघते.

वरील कारणमिमांसे वरुन आम्ही मुद्दा क्र. १ व २ वरील आमचे निष्कर्ष नोंदवित आहोत. वरील कारणमिमांसेचा विचार करता, प्रस्तुत अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. मात्र खर्चाबाबत कोणताही आदेश देण्याची आवश्यकता नाही. सबब आदेश –

**आदेश**

१) अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही

३) सदरची तक्रार अर्जदाराबाबत दिलेले दि. १५.७.२००८ व दिनांक ११.८.२००८ रोजीचे स्थगनादेश उठविण्यात येत आहेत.

४) वितरण कंपनीला तक्रार अर्जदाराकडे असणारी येणे बाकी नियमाप्रमाणे वसुलीची मुभा आहे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ११.११.२००८

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..